थोडक्यात

पानटपरीचालकाकडून दीड लाखाचा गुटखा हस्तगत

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । प्रतिबंधित पानमसाला, सुगंधित तंबाखू व गुटख्याचा साठा करणाऱ्या पानटपरीचालकाविरुद्ध कारवाई करून त्याच्याविरुद्ध सुमारे दीड लाख रुपये किमतीचा गुटखा हस्तगत करण्यात आला आहे. याबाबत पोलीस अंमलदार प्रवीण वानखेडे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे, की आरोपी मोहंमद माजिद सुफीयान खान (वय २०, रा. मदिना चौक, सारडा सर्कल रोड, नाशिक) हा पानटपरीचालक आहे. पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार पथकाने मोहंमद खान याच्या पानटपरीवर छापा टाकला असता तेथे ३३ हजार ३७० रुपये किमतीचा विमल पानमसाला, ५ हजार ६४० रुपये किमतीचा विमल पानमसाला किंग, १९ हजार ९८८ रुपये किमतीचा विमल किंग मसाला, ४ हजार ८०० रुपये किमतीचे पानमसाल्याचे ६० पाऊच, १४ हजार ४० रुपये किमतीचा हिरा पानमसाला, ३४ हजार २०० रुपये किमतीचा वाह पानमसाला, ४ हजार ६०८ रुपये किमतीचा राजनिवास सुगंधित पानमसाला, ३ हजार ९७५ रुपये किमतीची च्युईंग टोबॅको, १ हजार ४१० रुपये किमतीची टी-१ तंबाखू, ३९० रुपये किमतीची तंबाखू, ११ रुपये कमतीचा हिरा पानमसाला, १ हजार ३५० रुपये किमतीची रॉयल ७७० तंबाखू, ३ हजार ७७० रुपये किमतीची रॉयल तंबाखू, १ हजार ३४४ रुपये किमतीचा जाफरानी जर्दा, १ हजार ४८५ रुपये किमतीची टूलसी रॉयल तंबाखू, १ हजार ३०५ रुपये किमतीची बाबा लक्झरी च्युईंग टोबॅको व २ हजार ५९६ रुपये किमतीची टी-१ तंबाखू असा एकूण १ लाख ३९ हजार ५१६ रुपये किमतीचा गुटखा हस्तगत करण्यात आला आहे. या प्रकरणी मुंबई नाका पोलीस ठाण्यात पानटपरीचालक मोहंमद खानविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शेख करीत आहेत.

नाशिकमध्ये विविध घटनांत तिघांची आत्महत्या

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । आत्महत्येचा पहिला प्रकार नाशिकरोड येथे घडला. सुलाबाई धुलीराम पाईकराव (वय ६०, रा. एकलहरा-सामनगाव रोड, सिद्धार्थनगर, नाशिकरोड) या महिलेने दि. २१ जून रोजी सकाळी ९ वाजेच्या सुमारास राहत्या घरी काही तरी विषारी औषध सेवन केले होते. त्यामुळे त्यांना अस्वस्थ वाटू लागल्याने नातेवाईकांनी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले होते; मात्र औषधोपचार सुरू असताना डॉक्टरांनी तपासून पाईकराव यांना मृत घोषित केले. या प्रकरणी नाशिकरोड पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. आत्महत्येचा दुसरा प्रकार वाघाडी येथे घडला. आदिती अमित कुमावत (वय १६, रा. मजूरवाडी, वाघाडी, पंचवटी) या मुलीने राहत्या घरी अज्ञात कारणातून विषारी औषध सेवन केले. त्यावेळी तिला अस्वस्थ वाटू लागल्याने तिचे वडील अमित कुमावत यांनी औषधोपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून तिला मृत घोषित केले. या प्रकरणी पंचवटी पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. आत्महत्येचा तिसरा प्रकार पंचवटीत घडला. अथर्व शरदचंद्र हांडगे (वय १९, रा. व्हीएन प्राईड, सेवाकुंज, पंचवटी) याने राहत्या घरी अज्ञात कारणातून विषारी औषध सेवन केले होते. त्यामुळे त्याला अस्वस्थ वाटू लागले. ही बाब त्याचे वडील शरदचंद्र हांडगे यांच्या लक्षात आली. त्यानंतर त्यांनी अथर्वला औषधोपचारासाठी रुग्णालयात दाखल केले असता उपचार सुरू असताना डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले. या प्रकरणी पंचवटी पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

जलसंकट तूर्तास टळले - स्थानिकांच्या विरोधाला न जुमानता काश्यपीतून बंदोबस्तात विसर्ग

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । खालावलेल्या पातळीमुळे गंगापूरमधून पाणी उचलण्यात येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन स्थानिकांच्या विरोधाला न जुमानता सोमवारी पाटबंधारे विभागाने पोलीस बंदोबस्तात काश्यपी धरणातून गंगापूरसाठी पाण्याचा विसर्ग केला. काश्यपीतील सुमारे ४०० दशलक्ष घनफूट पाणी आल्यामुळे गंगापूरची पातळी उंचावणार आहे. शहरावरील टंचाईचे संकट निवारण्यासाठी ऐन पावसाळ्यात काश्यपीसह अनेक धरणे रिक्त करण्याची वेळ आली आहे. पोलिसांमार्फत दबाव टाकून पाटबंधारे विभागाने आमचे हक्काचे पाणी हिरावून नेल्याचा आरोप सरपंच व ग्रामस्थांनी केला आहे. जूनचा उत्तरार्ध संपुष्टात येण्याच्या मार्गावर असतानाही अद्याप गंगापूर धरण क्षेत्रात समाधानकारक पाऊस झालेला नाही. शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या गंगापूरची पातळी खालावली आहे. सध्या त्यात ९१८ दशलक्ष घनफूट म्हणजे १६ टक्के जलसाठा आहे. या धरण समुहातील काश्यपीत ४१९ दशलक्ष घनफूट (२२ टक्के) जलसाठा आहे. गंगापूर धरणातील पाणी पातळी ६१२.३ मीटरपर्यंत असणे आवश्यक ठरते. याखाली गेल्यास महानगरपालिकेला पाणी उचलण्यात अडचणी येतात. चर खोदावे लागतात. पावसाअभावी गंगापूरची पातळी ६०० मीटरपर्यंत खाली आल्यामुळे महापालिकेने काश्यपीतील पाणी गंगापूरमध्ये आणण्याची मागणी केली होती. हे पाणी गंगापूरमध्ये आल्यास धरणातील पाणी उचलणे सुकर होईल. अन्यथा शहरावर कपात वा तत्सम उपायांमुळे जल संकट निर्माण होण्याची चिन्हे होती. त्यामुळे पाणी सोडण्याची तयारी करण्यात आली होती. मात्र स्थानिकांच्या विरोधामुळे ते सोडता आले नव्हते. या पार्श्वभूमीवर, पाटबंधारे विभागाने पोलीस बंदोबस्त मागवून सोमवारी दुपारी पावणेबारा वाजता काश्यपीतील पाण्याचा मार्ग मोकळा केला. काश्यपीनगर व आसपासच्या शेतकऱ्यांनी विरोधाची तयारी केली होती. परंतु, पोलिसांनी त्यांना समज देऊन आठकाठी न करण्याची तंबी दिली. या विसर्गातून काश्यपीतील सर्व पाणी गंगापूरमध्ये आणले जाईल. जेणेकरून गंगापूरच्या पातळीत वाढ होईल आणि महापालिकेला पाणी उचलणे सुकर होणार आहे.

काश्यपी धरणासाठी जागा देऊन ६०० जण भूमिहीन झाले. आम्हाला पिण्यासाठी पाणी नाही. काही वर्षांपूर्वी पाटबंधारे विभागाने स्थानिकांसाठी धरणातील ३० टक्के पाणी राखीव ठेवण्याचे आश्वासन दिले होते. सध्या धरणात त्यापेक्षा कमी जलसाठा असूनही ते हिसकावून नेले जात आहे. पोलीस यंत्रणेद्वारे दबाव टाकून स्थानिकांना आंदोलनही करू दिले गेले नाही. परिसरातील धोंडेगाव, काश्यपीनगर, इंदिरानगर व देवरगाव ही चार गावे धरणातील पाण्यावर अवलंबून आहेत. गावातील महिलांना एक किलोमीटर पायपीट करून धरणातून पाणी आणावे लागते. एक-दोन दिवसांत परिसरातील सर्व ग्रुप ग्रामपंचायती ठराव करतील आणि पाटबंधारे विभागाला जाब विचारला जाईल. काश्यपी धरणाची निर्मिती करताना महापालिकेने भूमिहीनांना नोकरी देण्याचे दिलेले आश्वासनही पाळले नाही. केवळ ६० जणांना नोकरी मिळाली. उर्वरित बेरोजगार युवक शेतीवाडीवर उदरनिर्वाह करतात

सातपूरला जेतवन बुद्ध विहारात ज्येष्ठ पौर्णिमा उत्साहात साजरी

लोकमंथन । प्रतिनिधी

सातपुर । ज्येष्ठ पौर्णिमे निमीत्ताने धम्म सागर प्रबोधन संघ ट्रस्ट संचलित जेतवन बुद्ध विहार संस्थेच्या माध्यमातून ज्येष्ठ पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने जेतवन बुद्ध विहार धुप, दिप व फुलाने सजविण्यात आले होते. विहारात सर्व उपासक व उपासिका यांनी पांढरे कपडे परिधान करून सहपरिवार उपस्थित होते.या वेळी सर्व प्रथम सर्वांनी आदर्शाला पुष्प, धूप व दिप अर्पण करून अभिवादन केले. सामुहिक मंगल मैत्री करून बुध्द वंदने मध्ये सहभाग घेतला.

धम्म उपासिका रेखाताई नरवाडे यांनी त्रिसरण व पंचशील दिले व ज्येष्ठ पौर्णिमेचे महत्त्व समजावून सांगितले. धम्म उपासक अक्षय अतुल भाऊ कांबळे यांच्या परिवाराच्या वतीने खीरदान करण्यात आले . पौर्णिमा साजरी करण्यासाठी विहारात महिला पुरुष लहान मुले व मुली याचा सहभाग मोठ्या प्रमाणात होता. व जेतवन बुद्ध विहारातील सर्व कार्यकर्ते ही मोठ्या प्रमाणात उपस्थित होते, तसेच आज विहारात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे गुरु संत कबीर यांच्या जयंती निमित्त अभिवादन करून त्यांच्या जीवनाविषयी माहिती देण्यात आली. नासिक येथील पंचवटी परिसरातील आक्षेपार्ह पत्रक वाटप घटनेचा तीव्र निषेध करण्यात येऊन दोषींवर कठोर कारवाईची मागणी करण्यात आली. यावेळी किरण साळवे नयन कांबळे अवधूत वावरे वसंत अहिरे ,सुरेश भवर संदीप पवार, राहुल पगारे, छाया बनसोडे, रेखा नरवाडे , भारत गांगुर्डे मंगेश जाधव आदी उपस्थित होते सूत्रसंचालन मनोज अहिरे यांनी केले आभार संजय जगताप यांनी मानले

दीड लाखांचा प्रतिबंधित गुटखा जप्त

नाशिक । गुटख्याची बेकायदा वाहतूक करणारा पानस्टॉल चालक पोलीसांच्या हाती लागला असून, त्याच्या घरझडतीत लाखोंचा पानमसाला व सुगंधी सुपारीचा साठा मिळून आला आहे. शहर गुन्हेशाखेच्या युनिट दोनच्या पथकाने सदरची कारवाई सारडा सर्कल परिसरात केली आहे. पोलीसांनी सुमारे १ लाख ४० हजाराचा गुटखा हस्तगत केला असून, याप्रकरणी मुंबईनाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मोहम्मद माजीद सुफीयान खान (२०, रा. मातृछाया बिल्डींग मदिना चौक, सारडा सर्कल रोड) असे संशयित पानटपरी चालक गुटखा विक्रेत्याचे नाव आहे. खान पानस्टॉल चालक असून तो आपल्या दुकानात राजरोसपणे प्रतिबंधित गुटखा विक्री करीत असल्याची खबर शहर गुन्हे शाखेच्या युनिट दोनचे अंमलदार वाल्मिक चव्हाण यांना मिळाली होती. त्यानुसार रविवारी (ता. २३) पथकाने सारडा सर्कल रस्त्यावरील मदिना चौकात सापळा लावला असता संशयित पोलीसांच्या जाळ्यात अडकला. चोरी-छुपी विक्रीसाठी तो गुटख्याचे पुडे दुकानात घेवून जात असतांना मिळून आला.

मेघसंघ आणि पाऊस ।

ज्या उत्कटतेने एखाद्या प्रियकराने आपल्या प्रेयसीस भेटायला निघावे अगदी त्याच नि तशाच उत्कटतेने मेघसंघ खूप आवेगाने निघाले आहेत.

सर्व उन्हाळाभर दाह देणारा वैशाख वणवा आता विझू-विझू येईल. नि आणिक काही काळानं वर्षा ऋतू ऐन बहरात येईल. पावसाचे टपोरे थेंब वळचणीवर नाचू लागतील. मूक पाखरे झाडांच्या खोप्यात बसून नि खोप्या बाहेर आपले इवले-इवले डोळे काढून पावसाचा मुक्त पदन्यास पाहू लागतील.

आभाळात कुठल्यातरी एका दिशेला आकाशात लपलेली सौदामिनी खूप मोठा आवाज करीत पावसाच्या आगमनाची पूर्वसूचना देईल. विजेचे लखलखीत पैंजण आकाशात थिरकत राहील. काळ्याभोर जमिनीला पडलेल्या भेगा पाहिल्या की, असं वाटू लागतं, जणू त्या भेगा वरुणराजाची प्रार्थना करताहेत. बा वरुणराजा! का असा कठोर झालास? आमच्या तहानलेल्या तोंडात पाण्याचा एक थेंब तर पडू दे! किती दिवसांपासून आम्ही चातकासारखी वाट पाहतोय रे पाण्याची!

गुरेढोरे चारा न मिळाल्याने हताश झाली आहेत. हिरवा चारा पुष्कळ दिवसांपासून त्यांच्याही तोंडाला लागला नाही. ती मूक जनावरे देखील हिरवा चारा देणारा ऋतू केव्हा येतो नि आपण त्याला केव्हा भेटतो या प्रतीक्षेत आहेत. खेड्यातले लोक तर पावसाची अगदी उत्कटतेने वाट पाहत असतात. सासरी गेलेली लेक माहेरी अगदी पहिल्यांदाच आली की आईबापाला जो अनोखा आनंद होतो अगदी तसाच आनंद त्यांना मृगाच्या पहिल्या धारेने होतो. गावात पेरणीची तापद्रा सुरु होते. सुतारमेटावर हत्यारांचा आवाज सुरु होतो. सगळ्या गावांत पेरणीची झिम्मड उडते.

आता वैशाख वणवा विझू-विझू आलाय. पाऊस येईल. चांगल्या टपोऱ्या थेंबांची रांगोळी सगळीकडे घालील. धरतीच्या भेगांमध्ये पाण्याचे थेंब पडतील. तृणपात्यांच्या अंकुरांची हिरवी नक्षी सगळीकडे दिसू लागेल. आता जास्त प्रतीक्षा नाही कारण -

ज्या उत्कटतेने एखाद्या प्रियकराने आपल्या प्रेयसीस भेटायला निघावे अगदी त्याच नि तशाच उत्कटतेने मेघसंघ खूप आवेगाने निघाले आहेत.

असे उत्कटतेने निघालेले मेघसंघ मी गडचिरोली जिल्ह्यात अनेकदा पाहिलेत. मुळातच हा जिल्हा आजही अत्यंत निसर्गसंपन्न असा आहे. माझ्या घराच्या द्वारमंडपातील (पोर्चमधील) बंगईमध्ये मी तलतची गाणी ऐकत बसलेला असे. घरासमोर मोकळे विस्तीर्ण मैदान पसरलेले होते. जून महिना लागला की, काळेकभिन्न मेघ आकाशात सर्वत्र दिसू लागत नि आपले सारे गाव जणू त्या मेघांच्या मेघडंबरीच्या कोंदणात वसविले आहे, असे वाटू लागे.

वातावरणात थोडा उकाडा असे; पण वरच्या थंडगार मेघांना स्पर्श करुन आलेला वारा अंगाला लागला की वाऱ्याचा तो अमृतस्पर्श अजून हवाहवासा वाटे. आकाशातले हे काळेकभिन्न मेघ आपल्या घरासमोरच्या मैदानात उतरावेत, त्यांनी आपल्या हृदयात दडविलेला पाण्याचा फवारा एखाद्या मोराच्या पिसाऱ्यागत फुलवावा असे राहून-राहून वाटे.

मग मला ओढ लागे ती नदीवर जाण्याची. कुठल्यातरी तिरीमिरीत मी एकटाच मग नदीकडे निघे. नदीच्या पात्रात तरंगणाऱ्या काळ्याकभिन्न मेघांचे हलते प्रतिबिंब मला पाहायचे असे. एक मंद 'तिरीम' म्हणजे सौम्य प्रकाश नदीपात्र आणि आकाशातले मेघ यांच्यादरम्यान पसरलेला असे. नदीकाठची झाडे आणि आकाशातले मेघसंघ यांची प्रतिबिंबे नदीत स्वतःला यथेच्छ डुंबवून घेत. नभात कधी-कधी वीज चमके नि विजेची आकाशात चमकणारी रुपेरी तार पलीकडे 'आरमोरी' या गावाच्या शिवेपर्यंत गेली की काय असे वाटे. मग अकस्मात पाऊस सुरु होई. मी नखशिखांत भिजू लागे. नदीकाठावर भरुन आलेले सगळे मेघसंघ जणू संघटित होऊन बरसू लागत. पावसाचे वरुन भिरभिरत येणारे थेंब गालावर चटाचटा लागत; पण या थेंबांचा मार खाण्यातही मोठा आनंद असे. मग वाटे, आता या पावसानंतर सगळी धरती हिरवे लुगडे नेसून एखाद्या तालेवार बाईसारखी सजून जाईल. जिकडे पाहावे तिकडे सगळे चराचर हिरवेगार दिसेल. हा हिरवेपणा डोळ्यांना किती शांतवतो. या हिरवेपणाचा स्पर्श मनाला किती सुखावतो, असे सारखे वाटत राही.

देसाईगंज सोडून आता जवळपास दहा वर्षे झालीत; पण तिथला निसर्ग, तिथली हवा, तिथले पाणी अजूनही माझा रंध्रारंध्रातून नि श्वासाश्वासातून जणू धावू लागते. नि तिथले मेघसंघ आणि पाऊस?

तेही माझ्या रोमारोमात मग आठवणींच्या रुपात हळूहळू भिनत राहतात. ते मेघसंघ नि तो पाऊस मनाच्या मळ्यात अविरतपणे बरसत राहतात. वाटते, पुन्हा एकदा 'वैनगंगेच्या' काठावर जावे, पलिकडच्या शेतात लोंबणाऱ्या मेघाचा काळा पदर हाती धरावा नि अवचितपणे मेघाने मागे वळून आपल्याला म्हणावे -

छोड़ दो आँचल, ज़माना क्या कहेगा?

-योगेश रोकडे (कुंभार)
निवासी संपादक नाशिक
९४२२८९२१९८

एल&टी फायनान्स लिमिटेड
(आधीचे नाव, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
नोंदणीकृत कार्यालय: एल&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
CIN No.: L67120MH2008PLC181833
शाखा कार्यालय: नाशिक

L&T Finance

गहाण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी सार्वजनिक लिलाव

एल अँड टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 [54 ऑफ 2002] आणि या कायद्यांतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा लिलाव करत आहे. **"आधार कुठे आहे" आणि "जशी स्थिती आहे तशी"** त्याची देय रक्कम आणि पुढील व्याज, शुल्क आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **"सार्वजनिक लिलाव"** च्या मार्गाने.

कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव	तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता	कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक)	ताबा घेतला	बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये)	एकूण शिल्लक थकबाकी 27.03.2024 नुसार	आरक्षित किंमत (रुपयांमध्ये)	आरंभाची तारीख	लिलावाची तारीख आणि वेळ
1. श्रीरामन गोपालकृष्णन 2. विजयलक्ष्मी श्रीरामन	**वेळापत्रक-I** मालमत्तेचा सर्व तुकडा आणि पार्सल असलेला फ्लॅट क्र. C-3 चे मोजमाप 65.54 चौ. मीटर तळमजल्यावर बागेच्या क्षेत्राच्या मोजमापासह बांधलेले. 73.65 चौ. मीटर अथर्व अपार्टमेंट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या योजनेत 6.14% अविभाजित मालकीसह, प्लॉट क्र. 33 वर 811.80 चौ. मीटर गाव आनंदवल्ली येथे सर्वे क्र. 36/2 पैकी, ता. जिल्हा. नाशिक, महाराष्ट्र. **वेळापत्रक-II** मालमत्तेचा तो सर्व तुकडा आणि पार्सल असलेला फ्लॅट क्र. C-4 बुकिंग योजनेनुसार (मंजूर बिल्डिंग प्लान फ्लॅट क्र. 2 आणि 5 नुसार) तळमजल्यावर, 73.54 चौ. मीटर 73.65 चौ. मीटर + पार्किंग क्षेत्र 15.63 चौ. मीटर अथर्व अपार्टमेंट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या योजनेत 6-87% अविभाजित मालकीसह, प्लॉट क्र. 33 वर 811.80 चौ. मीटर गाव आनंदवल्ली येथे सर्वे. क्र. 36/2 पैकी, ता. जिल्हा. नाशिक, महाराष्ट्र. **वेळापत्रक-III** मालमत्तेचा सर्व तुकडा आणि पार्सल असलेला फ्लॅट क्रमांक C-11 62.14 चौ. मीटर टेरेस एरिया पहिल्या मजल्यावर बिल्ट अप. 59.42 चौ. मीटर अथर्व अपार्टमेंट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या योजनेत भूखंड क्रमांक 33 वर बांधण्यात आले. 811.80 चौ. मीटर गाव आनंदवल्ली येथे एस. क्र. 36/2 पैकी, ता. जिल्हा. नाशिक, महाराष्ट्र.	H18492220621104800	14 मार्च 2024	रु. 11,75,439.30	रु. 20,556,267.07/-	रु. 1,17,54,393	11-07-2024	15-07-2024 सकाळी 10 ते संध्याकाळी 5:30
1. श्रीरामन गोपालकृष्णन 2. विजयलक्ष्मी श्रीरामन	मालमत्तेचा तो सर्व तुकडा आणि पार्सल असलेले अपार्टमेंट क्र. 10 अंशतः पहिल्या मजल्यावर आणि अंशतः दुसऱ्या मजल्यावर एकूण 122.99 चौ. मीटर 7.06 चौरस मीटरच्या पार्किंग क्षेत्राचा वापर, उपयोग आणि आनंद घेण्याच्या पूर्ण आणि अनन्य अधिकारासह बिल्ट अप एरिया. आणि टेरेस क्षेत्र 5.76 चौ. मीटर पहिल्या मजल्यावर आणि 9.01 चौ. मीटर दुसऱ्या मजल्यावर आणि पहिल्या मजल्यावर धुण्याचे ठिकाण 19.36 चौ. फूट. सॉनेट विलास अपार्टमेंटमध्ये सांगितलेल्या अपार्टमेंटला लागून असलेला बिल्ट अप एरिया 7.65% मालकीसह सामाईक भागात	H18492220621104800	14 मार्च 2024	रु. 6,98,534/-	रु. 20,556,267.07/-	रु. 69,85,340/-	11-07-2024	15-07-2024 सकाळी 10 ते संध्याकाळी 5:30

सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना 12/07/2024 रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुराव्यांच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10% परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTHF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे 15/07/2024 रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे 16/07/2024 भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुर्दीनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेची तपासणी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार अधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकता. **नाव - शेखर काळे, संपर्क क्रमांक 9823271111, कार्यालय एल&टी फायनान्स लिमिटेड, कार्यालय नंबर 301, तिसरा मजला, जेनिथ कॉम्प्लेक्स, साकार संकुल जवळ, शिवाजी नगर, पुणे-411005. आणि संतोष तिवारी, संपर्क क्रमांक 9920490126, एल&टी फायनान्स लिमिटेड, कार्यालय: 6 वा मजला, वृंदावन बिल्डिंग, प्लॉट नंबर 177, कलिना, सीएसटी रोड, जवळ मर्सिडीज शोरूम, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098.** ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी बोली/ऑफर स्वीकार/नाकारू/बदलू/रद्द करू शकतो किंवा कोणतेही कारण न देता आणि कोणतीही पूर्वसूचना न देता ई-लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8 (6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुर्दीनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक)/सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड

दिनांक: 25.06.2024
ठिकाण: नाशिक

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, **मुख्य संपादक** अशोक विठ्ठल सोनवणे यांनी शितल प्रिंटर्स, प्लॉट नं. ६०, भूषण नगर, केडगाव देवी, अहमदनगर ४१४००१ (महाराष्ट्र) येथून छापून शॉप नं. २, तिसरा मजला, बळवंत प्लाझा, वकील वाडी, हॉटेल पंचवटीच्यासमोर, नाशिक - १, पिन - ४२२००१ येथे प्रकाशित केले. ✻ **व्यवस्थापकीय संपादक** - रंजन साळवी. फोन नं. (०२५३) २३१०६०० RNI : MAHMAR/2011/41224. EMAIL : lokmanthan.nashik2498@gmail.com (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील.)